**बातमी क्र.१**

जळगाव दि.१६ (          ) : कुरुक्षेत्रानंतर राजघराणे आणि कृषी संस्कृती यामधील परस्पर विरोधी नियम आणि जगण्याची पध्दत यामधून दोन वेगळया संस्कृतीमधील फरक अभिवाचनाद्वारे परिवर्तनच्या कलावंतांनी विद्यापीठातील अभिवाचन महोत्सवात सादर केला, तेव्हा प्रेक्षकांनी या सादरीकरणाला प्रचंड प्रतिसाद दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेच्या वतीने सोमवार पासून परिवर्तन नाटयसंस्थेच्या सहकार्याने तीन दिवसाचा अभिवाचन महोत्सव आयोजित करण्यात आला. मंगळवार, दि.१६ रोजी महाश्वेता देवी यांच्या `कुरुक्षेत्रानंतर ` या कादंबरीचे अभिवाचन करण्यात आले. उत्तरा या महिलेच्या पोटात वाढणारा गर्भ हा पांडवांचा एकमेव वारसदार. विधवा झालेल्या मात्र लहान असलेल्या उत्तरेच्या दुःखी मनाला जनपदातून आलेल्या पाच महिला एक वेगळे जग तिच्या समोर घेवून येतात. राजघराण्याचे आणि कृषी संस्कृतीचे परस्पर विरोधी नियम व जगण्याची पध्दत यातून दोन वेगळया संस्कृतीचा फरक या कादंबरीत उलगडून दाखविण्यात आला आहे. अनुषा महाजन यांच्या गाण्याने अभिवाचनात रंगत अधिक वाढली तर मंजूषा भिडे यांची कुंती, रेखा महाजन यांनी सादर केलेली विशादीन यांच्यातील संघर्ष प्रेक्षकांना अधिक भावला. सशक्त अभिनयाने या अभिवाचनाची रंगत वाढत गेली. यामध्ये डॉ.रेखा महाजन, मंजूषा भिडे, मानसी जोशी, जयश्री पाटील, अनुषा महाजन, हर्षदा पाटील, राणी चव्हाण,मोना खरे यांनी भाग घेतला. दिग्दर्शन मंजूषा भिडे यांचे होते. सोनाली पाटील व सुनिता दप्तरी यांची निर्मिती आणि मोना तडवी यांची प्रकाश योजना होती. उदया या अभिवाचनाचा समारोप दि.बा.मोकाशी यांच्या पालखी या कांदबरीच्या अभिवाचनाने होणार आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१६ (              ) : भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांचा परिवर्तन नाटयसंस्थेच्या वतीने मानपत्र देवून सन्मान करण्यात आला.

विद्यापीठ विचारधारा प्रशाळेच्या वतीने सोमवार पासून परिवर्तन नाटयसंस्थेच्या सहकार्याने अभिवाचन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १७ तारखेपर्यंत हा महोत्सव होणार आहे. या अभिवाचन महोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री.दिलीप पाटील, प्राचार्य एल.पी.देशमुख, श्री.अमर कुकरेजा, विनोद पाटील, मंजूषा भिडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना श्री.दिलीप पाटील यांनी वाचन कमी होत असताना वाचन संस्कृतीचे बीज रोवण्याचे काम परिवर्तनच्या वतीने केले जात असून विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना सहकार्य केले जाईल असे सांगितले. प्रा.माहुलीकर यांनी वाचन संस्कृती रुजण्यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन आवश्यक असल्याचे सांगून भिलार सारखी गावे देशात उभी राहायला हवीत अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव विद्यापीठाला दिल्याबद्दल कुलगुरुंचा परिवर्तनच्या वतीने मानपत्र देवून गौरव करण्यात आला. या मानपत्राचे वाचन हर्षल पाटील यांनी केले. प्रारंभी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. विशाखा उंटवाल या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. मंजूषा भिडे यांनी परिवर्तनची भूमिका मांडली.

उद्‌घाटनानंतर उदय प्रकाश यांच्या वॉरेन हेस्टिंगचा सांड या कलाकृतीचे वाचन करण्यात आले.भारतीय संस्कृती, इंग्रजांनी केलेले शोषण आणि मोगलांचे अपयश यावर सांडाच्या माध्यमातून करण्यात आलेले सुंदर भाष्य आणि परिवर्तनच्या कलावंतांनी केलेले उत्तम सादरीकरण यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले. या अभिवाचनात नारायण बाविस्कर, अंजली हंडे, हर्षदा कोल्हटकर, उदय सपकाळे, मिलिंद जंगम, चंद्रकांत इंगळे आणि हर्षल पाटील यांनी भाग घेतला. संकल्पना विजय जैन यांची होती. प्रकाश योजना राहुल निंबाळकर यांनी केली तर दिग्दर्शन नारायण बाविस्कर यांचे होते.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाद्वारा चामुंडा माता बहुउद्देशीय विकास परिसर धुळे संचलित, परीश्रम मतिमंद मुलांमुलींची निवासी शाळा, पारोळा येथे विशेष विद्यार्थी शाळा भेट उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये एम. एड. विद्यार्थ्यांना दिव्यांग तील मतिमंद प्रवर्गाविषयी माहिती जाणून घेतली. मतिमंद प्रवर्गाकरिता अध्ययन-अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि शैक्षणिक कृती विषयक शाळेतील शिक्षकाशी चर्चा केली. परीश्रम मतिमंद शाळातील शिक्षक दत्तानंद पाटील यांनी माहिती दिली. प्रात्यक्षिक पूर्ततेकरिता एम. एड. प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी आणि डॉ. संतोष खिराडे यांनी मार्गदर्शन केले.

सदरील उपक्रमाकरिता शाळेचे अध्यक्ष योगेश महाजन, शिक्षक हेमत महाजन, दत्तानंद पाटील, प्रताप पाटील,दत्तात्रय चव्हाण, दिलीप सांळुखे,सविता पाटील, वैशाली पाटील आणि अनंतकुमार महाजन याचे सहकार्य लाभले. तसेच शिक्षणशास्त्र विभागातील सहकारी डॉ. संतोष खिराडे, श्रीमती सीमा बारी आणि उमेश भासले आणि एम. एड. विद्यार्थी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

---

**बातमी क्र.४**

जळगाव दि. १६ ( ) आजच्या धकाधकीच्या युगात तरुणांमध्ये नैराश्य वाढत जात असून हे नैराश्य संपवण्यासाठी पुस्तकांना जवळ करणे हा एकमेव उपाय असल्याचे प्रतिपादन डॉ.संजीवकुमार सोनवणे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्रात माजी राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे यांची उपस्थिती होती. तरुणांचे सामाजिक भान आणि वाचन संस्कृती या विषयावर बोलताना डॉ.सोनवणे यांनी सांगितले की, मोबाईल, इंटरनेट यासारख्या आभासी दुनियेत तरुणाई रममाण झाली आहे. ही पिढी वाचत असली तरी चांगले साहित्य त्यांच्या पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सध्या सामाजिक जीवन हे अनेक कारणांनी भरकटत चालले आहे. तरुणांमध्ये नैराश्य वाढते आहे. सकारात्मक जीवन जगायचे असेल तर ग्रंथांचे वाचन महत्वाचे आहे. ग्रंथ हे प्रेरणा देण्याचे काम करतात. वाचनामुळे सम्यक ज्ञान प्राप्त होते असेही ते म्हणाले. प्रारंभी डॉ.चिकाटे यांनी प्रास्ताविक केले. श्री.विजय आहेर यांनी आभार मानले.

---

जा.क्र . : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 16 ऑक्टोबर,2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी